## २) अर्ज सादर करण्याची पद्धत व अर्ज स्वीकृती

२.१) शिक्षक पात्रता परीक्षेस प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या अर्हताधारक परीक्षार्थींनी अर्ज करण्यापूर्वी जाहीरातीतील सर्व माहिती TET संदर्भातील सर्व शासन निर्णय व सर्वसाधारण सूचनांचे बारकाईने वाचन करावे. तसेच अर्ज भरण्यासाठी व सादर करण्यासाठी संगणकावरील ऑनलाईन कृती ओघ प्रपत्राचेही वाचन करावे.

२.२) परिषदेच्या www.mahatet.in या अधिकृत website वरुन सर्वप्रथम परिषदेने दिलेल्या सूचनांची माहिती प्रिंट कॉपी करुन घ्यावी.

२.३) अर्जातील सर्व मुद्यांचे व त्यासंबंधित सूचनांचे बारकाईने वाचन करावे.

२.४) इ. १ ली ते इ. ५ वी साठीच्या शिक्षकांकरिता (पेपर I) व इ. ६ वी ते इ. ८ वी साठीच्या शिक्षकांकरिता (पेपर II) याप्रमाणे एकाच दिवशी दोन वेगवेगळ्या स्वतंत्र परीक्षा राहतील व या सूचना पत्रातील वेळापत्रकात नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या वेळाही स्वतंत्र राहतील. तसेच परीक्षा केंद्रही वेगळे राहील.

२.५) एक किंवा दोन्ही परीक्षा द्यावयाच्या आहेत, याची नोंद अर्जामध्ये नमूद करणे आवश्यक आहे. अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे परीक्षेस बसता येईल याची नोंद घ्यावी.

२.६) प्राथमिक वर्ग इ. १ ली ते इ. ५ वी (पेपर I) व उच्च प्राथमिक वर्ग इ. ६ वी ते इ. ८ वी (पेपर II) याकरिता परीक्षा वेगवेगळी होईल. परीक्षार्थींना दोन्ही परीक्षेस प्रविष्ट व्हावयाचे असले तरी एकच आवेदनपत्र भरावे व त्यामध्ये दोन्ही परीक्षेस प्रविष्ट व्हावयाचे आहे असे आवेदनपत्रामधील सूचित पर्यायाद्वारे नमूद करावे.

२.७) प्रत्येक परीक्षेकरीता स्वतंत्र शुल्क आकारले जाईल.

२.८) दोन्ही परीक्षांस प्रविष्ट व्हावयाचे असल्यास दोन्ही परीक्षांचे विहित शुल्क स्टेट बँक ऑफ इंडियाच्या / स्टेट बँक ऑफ हैद्राबादच्या नजीकच्या शाखेत चलनाद्वारे भरणे आवश्यक आहे.

२.९) परीक्षा शुल्क पुढीलप्रमाणे राहील.

२.९.क) पेपर १ किंवा पेपर २ यापैकी एका परीक्षेकरिता पूर्ण भरलेल्या अर्जासोबत खुल्या प्रवर्गातील व इतर मागास ओबीसी, एसबीसी, व्हीजेएनटी परीक्षार्थीने रु.५००/-(अक्षरी रुपये पाचशे फक्त) व मागासवर्गीय प्रवर्गातील (एस.सी., एस.टी, व अपंग) उमेदवाराने रु. २५०/- (अक्षरी रुपये दोनशे पन्नास फक्त) चलनाने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या / स्टेट बँक ऑफ हैद्राबादच्या कोणत्याही शाखेत त्या शाखेने निर्धारित केलेल्या वेळेच्या मर्यादेमध्ये भरावे. भरलेल्या संबंधित चलनाचा Transaction Id क्रमांक व रक्कमेचा अंक आवेदपनपत्रामध्ये लिहिणे आवश्यक आहे. (चलनाचा नमुना संकेतस्थळावर आहे.)

२.९.ख) पेपर १ व पेपर २ या दोन्ही परीक्षेकरीता पूर्ण भरलेल्या अर्जासोबत खुल्या प्रवर्गातील व इतर मागास ओबीसी, एसबीसी, व्हीजेएनटी परीक्षार्थीने रु.८००/- (अक्षरी रुपये आठशे फक्त) व मागासवर्गीय प्रवर्गातील (एस.सी., एस.टी व अपंग) उमेदवाराने रु. ४००/- (अक्षरी रुपये चारशे फक्त) चलनाने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या किंवा स्टेट बँक ऑफ हैद्राबादच्या कोणत्याही शाखेत त्या शाखेने निर्धारित केलेल्या वेळेच्या मर्यादेमध्ये भरावे. भरलेल्या संबंधित चलनाचा Transaction Id क्रमांक व रक्कमेचा अंक आवेदनपत्रामध्ये लिहिणे आवश्यक आहे. (चलनाचा नमुना संकेतस्थळावर आहे.)

२.९. क) चलन अपडेट करण्यासाठी आवेदनपत्र भरण्याचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर दोन दिवसांची मुदत देण्यात येईल.

२.१०) चलनाची प्रत आवेदनपत्रासोबत परीक्षेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

चलनाद्वारे State Bank of India, Main Branch Pune - A/C No. 34246155872 IFSC Code - SBIN0000454 / State Bank of Hyderabad, Main Branch Pune - A/C No.62309002043 IFSC Code - SBHY0020329 Branch Code - 20329 या बँक खात्यावर TET परीक्षा फी भरण्यात यावी व सदरहू चलनाची प्रत आवेदनपत्रासोबत जोडावी.

२.११)
- Apply online हे बटन (लिंक) क्लिक करुन online अर्ज भरावा. सदर अर्ज भरण्याची मुदत या सूचना पत्रातील वेळापत्रकानूसार राहील.
- जे परीक्षार्थी डिसेंबर २०१३ च्या परीक्षेस प्रविष्ठ झाले होते त्यांनी Old Registration हे बटन क्लिक केल्यानंतर मागील वर्षीचा Registration No/Examination Seat No. भरल्यानंतर मागील वर्षीची माहिती Open होईल. या माहितीमध्ये आवश्यक ते बदल करता येतील ही कार्यवाही शक्य न झाल्यास किंवा आपणांस नव्याने नोंदणी करावयाची असेल तर New Registration बटन वर click करता येईल व अर्ज सादर करता येईल.

२.१२) आवेदनपत्रातील माहिती इंग्रजीमध्ये CAPITAL लिपी मध्ये भरावी.

२.१३) आवेदनपत्रात मोबाईल नंबर (१० अंकी) व email id भरणे आवश्यक आहे.

२.१४) आवेदनपत्रामध्ये पासपोर्ट (३.५ सें.मी. x ४.५ सें.मी.) साईज फोटो व स्वाक्षरीसह Scanning करून अपलोड करावा.

२.१५) एकापेक्षा जास्त आवेदनपत्रे भरली असल्यास ज्या आवेदनपत्रासोबत परीक्षा शुल्क भरल्याची चलन प्रत आहे तो अंतिम समजण्यात येईल.

२.१६) याबाबतची इतर सर्व आवश्यक माहिती संकेतस्थळावर उपलब्ध केली जाईल. तसेच वेळोवेळी सूचना दिल्या जातील.

२.१७) विशिष्ट कारणांमुळे परीक्षार्थी अपात्र ठरत असल्यास तशी सूचना लाल रंगात दर्शविली जाईल. असे परीक्षार्थी परीक्षेसाठी अपात्र ठरणार असल्याने त्यांनी सदर माहितीची खातरजमा करून अर्ज भरावा.

संगणकाने स्वीकारलेल्या अर्जानुसार काही कारणामुळे परीक्षार्थी अपात्र ठरत असल्यास संबंधित कारणे online नमूद होतील. त्यानंतर परीक्षार्थीने खलील २.१८ मधील सूचनेप्रमाणे कार्यवाही करावी.

२.१८) Online प्रणालीमध्ये अपात्र दर्शविलेल्या परीक्षार्थींना त्यांच्या अर्जाबाबत आक्षेप वेळापत्रकात दिलेल्या दिनांकापर्यंतच्या कालावधीत ऑनलाईन नोंदवावे लागतील. online अर्जाची प्रत व आक्षेपांतर्गत बाबींच्या संबंधाने सादर करावयाच्या कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती व मूळ कागदपत्रांसह उपस्थित राहून आपले लेखी निवेदन वेळापत्रकात दिलेल्या दिनांकापर्यंत संबंधित गटशिक्षणाधिकारी/ जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक शिक्षण)/ शिक्षण निरीक्षक, मुंबई (प.,उ.,द.) यांचेकडे कार्यालयीन वेळेत समक्ष सादर करावीत.

२.१९) **या संदर्भात उपरोक्त मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.**

२.२०) परीक्षार्थीने सर्व माहिती संगणकावरील अर्जात भरल्यानंतर ती प्रत्येक टप्प्यावर save करण्यापूर्वी त्याची तपासून खात्री करावी व नंतरच save करावी. अर्ज save केल्यावर माहितीत बदल करता येणार नाही. एकदा अर्ज save केल्यानंतर जातीच्या संवर्गात बदल करता येणार नाही.

२.२१) save केलेल्या अर्जाच्या किमान २ छापील प्रती (print copies) घ्याव्यात.

२.२२) छापून घेतलेल्या अर्जाच्या एका प्रतीवर परीक्षार्थीने विहित जागेत आपली स्वाक्षरी करावी. तसेच विहित जागेत ३.५ सें.मी x ४.५ सें.मी आकाराचा (पासपोर्ट साईज) नवीनतम (लेटेस्ट) फोटो चिकटवूनतो अर्ज संबंधित गटशिक्षणाधिकारी/ जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) / शिक्षण निरीक्षक मुंबई (प.,उ.,द.) यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडून अर्ज स्वीकृतीचे वेळी स्वाक्षरीसह प्रमाणित करून घ्यावा. फोटोखाली किंवा दिलेल्या जागी दिलेल्या रकान्यात देखील उमेदवाराने त्यांचे समोर स्वाक्षरी करावी.

२.२३) उपरोक्त प्रमाणे परीक्षार्थीने पासपोर्ट साईज फोटो व स्वत:ची सही scan केलेला अर्ज मूळ चलनासह वेळापत्रकात दिलेल्या तारखेपर्यंत कार्यालयीन वेळेत परीक्षा केंद्र म्हणून अर्जात नमूद केलेल्या महाराष्ट्रातील जिल्हा मुख्यालयाच्या संबंधित जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ शिक्षण निरीक्षक, मुंबई (प.,उ.,द.) / गटशिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयाने निश्चित करून दिलेल्या ठिकाणी कार्यालयीन वेळेत समक्ष सादर करावा. विहित मुदतीनंतर सादर केलेले अर्ज ग्राह्य समजले जाणार नाहीत.

२.२४) ऑनलाईन अर्ज भरताना तांत्रिक कारणांमुळे (विद्युत प्रवाह खंडीत होणे, संगणक बंद पडणे इत्यादी) समस्या उद्‌भवल्यास परीक्षार्थीने पुन्हा अर्ज भरण्यास सुरुवात करावी. मात्र आपणांस एस्.एम्.एस्. सुविधेद्वारे मिळालेला रजिस्ट्रेशन क्रमांक व Login Id आणि आपला Passwordवापरून परत ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यास सुरुवात करावी. त्यापुढील माहिती भरण्यास अर्ज ऑनलाईन उपलब्ध होईल. पूर्वी भरलेली माहिती पुन्हा भरण्याची आवश्यकता असणार नाही. परंतु रजिस्ट्रेशन क्रमांक व Login Id व Password मिळाला नसेल तर परत प्रथमपासून आवेदनपत्र ऑनलाईन भरण्याची कार्यवाही करावी.

२.२५) अर्ज भरताना तांत्रिक अडचण आल्यास

अ) ई-मेल द्वारे ऑनलाईन हेल्पलाईनशी संपर्क साधावा. **ई-मेल : (mahatet@gmail.com)**

ब) हेल्पलाईन क्रमांक : ०७७७४०१२४५३ व ०७७७४०१२४५४

२.२६) ऑनलाईन प्रक्रियेद्वारे सादर केलेल्या अर्जाची अतिरिक्त प्रत (प्रिंट) उपलब्ध होणार नाही, याची परीक्षार्थीने नोंद घ्यावी.

२.२७) परीक्षेसाठी अपात्र परीक्षार्थींची माहिती परिषदेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने यथावकाश उपलब्ध करून देण्यात येईल. परीक्षेसाठी अपात्र ठरविण्यात आलेल्या परीक्षार्थींनी क्रमांक २.१८ वरील सूचनेप्रमाणे विहित मुदतीत आक्षेप नोंदवावेत.

२.२८) परीक्षेसाठी पात्र ठरणाऱ्या परीक्षार्थींची प्रवेशपत्रे परिषदेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात येतील. त्यासाठी परीक्षार्थींनी परिषदेच्या संकेतस्थळावरील www.mahatet.in 'शिक्षक पात्रता परीक्षेसाठी करावयाचा अर्ज' या पानावरील प्रवेशपत्र (Admit Card) हे बटण दाबून प्रिंट काढणे आवश्यक राहील. सदर प्रिंट येण्याकरिता परीक्षार्थीला त्याचा अर्ज क्रमांक, login Id & password व जन्मदिनांक ही माहिती भरावी लागेल. या प्रवेशपत्रावर परीक्षेचा दिनांक, परीक्षास्थळ, बैठक क्रमांक, आरक्षण प्रवर्ग व अपंग परीक्षार्थीने अर्जासोबत दिलेला scanned photo, स्वाक्षरी ऐच्छिक विषय व परीक्षा माध्यम इत्यादी माहितीचा समावेश असेल.

२.२९) परीक्षार्थीने भरलेला अर्ज save करण्यापूर्वी परीक्षा केंद्रासाठी एका जिल्हा मुख्यालयाची निवड करावयाची आहे. **परीक्षा केंद्रासाठी एकदा निवड केलेल्या जिल्हा मुख्यालयात बदल करता येणार नाही.**

२.३०) परीक्षा केंद्र म्हणून निवड केलेल्या महाराष्ट्र राज्यातील जिल्हा मुख्यालयामधील परिषदेने निश्चित केलेल्या परीक्षा केंद्रावर परीक्षेचे आयोजन करण्यात येईल. परीक्षा केंद्राचे नाव व पत्ता प्रवेशपत्रावर नमूद करण्यात येईल.

- शिक्षक पात्रता परीक्षार्थी संख्या व जिल्हा मुख्यालयातील शाळांची संख्या विचारात घेऊन काही ठिकाणी जिल्हा मुख्यालयाजवळील तालुका मुख्यालयही किंवा सुविधा उपलब्ध असलेले गाव/ शहर केंद्र म्हणून दिले जाईल, याची नोंद घ्यावी.

२.३१) उपरोक्त परीक्षेसाठी परीक्षार्थी इंटरनेट सुविधा असलेल्या संगणकावरुनच निर्धारित संकेतस्थळावरुन अर्ज भरु शकेल. ऑनलाईन भरलेली माहिती, अर्ज save करण्यापूर्वी बरोबर असल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी परीक्षार्थीची राहील.

२.३२) प्रस्तूत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. ऑनलाईन पद्धती व्यतिरिक्त अन्य पद्धतीने प्राप्त होणारे अर्ज रद्द करण्यात येतील व ते आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

२.३३) अर्जातील माहिती खोटी व चुकीची आढळल्यास संबंधित परीक्षार्थी दंडात्मक कारवाईस पात्र राहील. तसेच चुकीच्या माहितीच्या आधारे परीक्षार्थीने परीक्षा दिल्याचे सिद्ध झाल्यास कोणत्याही वेळी परीक्षार्थीचा प्रवेश रद्द केला जाईल, तसेच पात्रता प्रमाणपत्रही रद्द केले जाईल याची नोंद घ्यावी.

२.३४) विहित दिनांकानंतर व विहित वेळेनंतर आलेला कोणताही अर्ज संगणकीय प्रणालीमध्ये स्वीकृत केला जाणार नाही. चलन अपडेट करण्याची निर्धारित मुदत संपल्यानंतर चलन अपडेट होणार नाही व परीक्षार्थीस आवेदनपत्राची हार्ड कॉपी काढता येणार नाही.

२.३५) परीक्षार्थीने अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती बरोबर आहे असे गृहीत धरुन कोणत्याही टप्प्यावर पडताळणीच्या अधिन राहून अर्ज स्वीकृत करण्यात येतील. परीक्षेच्या निकालानंतर पात्र परीक्षार्थींची पात्रता जाहीर करण्यापूर्वी करण्यात येणाऱ्या कागदपत्रांच्या छाननीमध्ये अर्जातील माहिती खोटी/ विसंगत/ चुकीची /बेकायदेशीर असल्याचे स्पष्ट झाल्यास परीक्षार्थीस अपात्र ठरविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

२.३६) संकेतस्थळावर किंवा संबंधित गटशिक्षणाधिकारी /जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व शिक्षण निरीक्षक, मुंबई (प.उ.द.) यांच्या कार्यालयात अर्ज स्विकृत झाला नाही किंवा केला गेला नाही तर संकेतस्थळावर तक्रार सकारण नोंदवावी. तसेच त्यासंबंधीचे लेखी निवेदनही पुराव्याच्या कादपत्रासह गटशिक्षणाधिकारी/ जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व शिक्षण निरीक्षक, मुंबई (प.उ.द.) यांचे कार्यालयात वेळापत्रकानुसार दिलेल्या मुदतीत जमा करावे.